उर्वरित पिकविम्यासाठी रविकांत तुपकरांनी मुंबईतून ठणकावले..! तुपकर आक्रमक..! >> पान 2

भारतीय लोकशाही अबाधित राहण्यासाठी सर्वांचे सहकार्य महत्त्वाचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन : लोकतंत्र सेनानींचा सत्कार >> पान 3

लोकशाहीच्या मूल्यांसाठी लढलेले सेनानी आजच्या पिढीसाठी दीपस्तंभ : निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे >> पान 4



# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com


मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 285 ■ गुरूवार, दि. 26 जून 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006


**सुविचार**

नेहमी आभार मानायला विसरू नका.



थोर कल्याणकारी राजाला मानाचा मुजरा !

## वीजदरात होणार कपात, पाच वर्षांत २६ टक्क्यांनी वीजदर कमी करणार : मुख्यमंत्री




दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी : महाराष्ट्रातील वीजदर पाच वर्षांत २६ टक्क्यांनी कमी केले जातील, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी सांगितलं. सुरुवातीच्या वर्षात १० टक्क्यांनी सुरुवात होईल, असंही ते म्हणाले. राज्याच्या इतिहासात वीजबिल कपात करण्याची ही पहिलीच वेळ आहे, असा दावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलाय.**

''राज्याच्या इतिहासात पहिल्यांदाच, वीजदर पहिल्या वर्षी १० टक्के आणि टप्प्याटप्प्याने पाच वर्षांत २६ टक्के कमी केले जातील. महावितरणच्या याचिकेवर हा निर्णय दिल्याबद्दल आम्ही महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाचे (एमईआरसी) आभारी आहोत,'' असं ऊर्जा विभागाचे प्रमुख असलेल्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एक्स वर केलेल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे.

यापूर्वी, वीजदरात १० टक्के वाढ करण्याच्या याचिका एमईआरसीकडे सादर करण्यात आल्या होत्या. परंतु, राज्याच्या इतिहासात पहिल्यांदाच, महावितरणने वीजदर



कमी करण्यासाठी याचिका दाखल केली होती. वीज वितरण कंपनीची ही याचिका एमईआरसीने स्वीकारली होती, असंही देवेंद्र फडणवीस म्हणाले.

वीजदर कपातीचा लाभ सर्वच वीज ग्राहकांना होणार आहे. हा आदेश घरगुती, औद्योगिक आणि >> पान २

## गेल्या ११ वर्षांपासून देशात 'अघोषित आणीबाणी'

### काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगेंचा घणाघाती प्रहार



नवी दिल्ली : ज्यांनी देशाच्या स्वातंत्र्य चळवळीत आणि संविधान निर्मितीत योगदान दिले नाही. ज्यांनी हे संविधान बनवण्यात सहकार्य केले नाही. जे नेहमीच संविधानाविरुद्ध बोलत होते. भाजप देशव्यापी 'संविधान बचाव आंदोलनाला' घाबरत आहे, म्हणूनच आज ते पुन्हा आणीबाणीबद्दल बोलत आहेत, असा घणाघात काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी केला. भाजपकडून आणीबाणीला ५० वर्ष झाल्याच्या पार्श्र्वभूमीवर काँग्रेसला टीकेची झोड उठवल्यानंतर खरगे यांनी पत्रकार परिषद घेत भाजपचा चांगलाच समाचार घेतला. 'गेल्या ११ वर्षांपासून देशात अघोषित आणीबाणी' असल्याचा हल्लाबोल त्यांनी केला.

जर आज आपले संविधान संकटात असेल तर ते नरेंद्र मोदींमुळे आहे. नरेंद्र मोदी देशाला उद्ध्वस्त करत आहेत. जेव्हा जेव्हा एखादा व्यक्ती देशाच्या हितासाठी बोलतो तेव्हा नरेंद्र मोदी ते सहन करू शकत नाहीत. शेवटी, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि चळवळीचे स्वातंत्र्य कुठे आहे? जर एखादा विद्यार्थी देशाच्या हितासाठी बोलला तर त्याला देशद्रोही म्हटले जाते. जर एखादा पत्रकार काही लिहितो तर त्याला तुरुंगात टाकले जाते. जर एखाद्या मासिकाने सरकारच्या उणीवांबद्दल लिहिले तर तेही नरेंद्र मोदी आणि त्यांचे सरकार स्वीकारत नाही. ज्या सरकारमध्ये लोकांना बोलण्याचे स्वातंत्र्य नाही त्या सरकारमधील लोकांकडून काहीही अपेक्षा करता येत नाही. केवळ भाषणांनी पोट भरत नाही, असा हल्लाबोल त्यांनी केला.

खरगे यांनी सांगितले की, ट्रम्प म्हणाले की मी भारत आणि पाकिस्तानमधील युद्ध थांबवले, पण नरेंद्र मोदींच्या तोंडून एकही शब्द निघाला नाही. ट्रम्प यांनी हे १-२ वेळा नाही तर १७ वेळा सांगितले, तरीही मोदी गप्प राहिले. नरेंद्र मोदी ट्रम्पला घाबरतात, >> पान २

## राजू खरेंना उमेदवारी देणे ही आमची चूक; निवडून आलेल्या आमदाराबाबत शरद पवारांच्या राष्ट्रवादीतून नाराजी

दैनिक आपला विदर्भ

मुंबई : विधानसभा निवडणुकीत भाजप महायुतीने घवघवीत यश मिळवलं असून मोठ्या बहुसंख्येनं सरकार स्थापन केलं. विशेष म्हणजे लोकसभा निवडणुकीत केवळ १ खासदार आलेल्या अजित पवारांच्या राष्ट्रवादीला देखील मोठं यश मिळालं.

राष्ट्रवादीचे ४० पेक्षा जास्त आमदार निवडून आले. मात्र, दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला विधानसभा निवडणुकीत म्हणावं तसं यश आलं नाही. शरद पवारांचे केवळ १० आमदार विजयी झाले असून सोलापूर जिल्ह्यातील मोहोळमध्ये अजित पवारांच्या उमेदवाराचा पराभव करत राजू खरे निवडून आले. मात्र, राजू खरे निवडून आल्यापासून त्यांची जवळीक ही शिवसेना मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या पक्षासोबत दिसून येत आहे. तर, काही दिवसांपूर्वी अजित पवारांसोबतही त्यांच्या जाहिराती झळकल्या होत्या, त्यावरुन आता शरद पवारांच्या राष्ट्रवादीत आमदार राजू खरेंबाबत नाराजी असल्याचे समोर आलं आहे.

## कोल्हापूर जिल्ह्यात एकनाथ शिंदे यांचा काँग्रेसला 'जबर' धक्का

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** कोल्हापूर महानगरपालिकेतील २५ माजी नगरसेवक आणि काँग्रेसच्या असंख्य पदाधिकाऱ्यांनी आज उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेमध्ये पक्षप्रवेश केला. यात कोल्हापूर मनपामधील तीन माजी महापौरां चाही समावेश आहे. या सर्वांचे शिंदेंनी पक्षात स्वागत करून आगामी मनपा निवडणुकांच्या रणांगणात पक्षाच्या वतीने शड्डू ठोकला आहे. यामुळे शिवसेनेने पश्चिम महाराष्ट्रात आपल्या पक्षविस्तार सुरू केला असल्याचे चित्र पहायला मिळत आहे. काल उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या मुक्तागिरी या शासकीय निवासस्थानी पार पडलेल्या या पक्षप्रवेशावेळी कोल्हापूर मनपाचे माजी स्थायी समिती सभापती शारंगधर देशमुख, माजी महापौर निलोफर आजरेकर, माजी महापौर प्रतिभा नाईक नवरे, माजी महापौर सुनील कदम, माजी उपमहापौर दिगंबर फराकटे, माजी स्थायी समिती सभापती संभाजी जाधव, माजी सभापती अभिजित चव्हाण, यांच्यासह असंख्य पदाधिकाऱ्यांनीही शिवसेनेमध्ये पक्षप्रवेश केला.

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडविणार- पाणीपुरवठा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणमधील कर्मचाऱ्यांना आर्थिक लाभ मंजूर करण्याबाबत, सातव्या वेतन आयोगाच्या तरतुदी लागू करणे, वेतन आयोगाची थकबाकी देणे यासह इतर प्रश्न सोडविण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी सांगितले. एच.एस.बी.सी.बँक, फोर्ट येथे पाणीपुरवठा विभागातील कर्मचारी यांच्या विविध विषयाबाबत बैठक आयोजित करण्यात आली. यावेळी राज्यमंत्री मेघना बोर्डीकर बोलत होत्या. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे सदस्य सचिव ई रविंद्रन, वित्त विभागाचे संचालक सिताराम काळे, उपसचिव राजेंद्र गैगने, भारतीय मजदूर संघाचे प्रदेश मंत्री गजानन गटलेवार, दशरथ पिपरे, माधव लोहे, अनिल तळेले, बाजीराव सोनवणे, व्ही.के.पांडव, व्ही.जी.शिरसाठ यासह इतर अधिकारी बैठकीला उपस्थित होते. राज्यमंत्री मेघना बोर्डीकर म्हणाल्या की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील कर्मचाऱ्यांचे विविध सेवाविषयक मागण्यांबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल आणि लवकरच हे प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

## उच्च शिक्षित मुलीनं पळून जाऊन केलं लग्न, आईनं नैराश्यातून केली आत्महत्या

**सातारा/प्रतिनिधी :** एका उच्च शिक्षित मुलीनं गावातीलच युवकासोबत पळून जाऊन लग्न केलं. यामुळे तणावात येऊन आईनं विष पिऊन जीवन संपवल्याची हृदयद्रावक घटना सातारा तालुक्यात घडली. या घटनेनं संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. प्रेमी युगुलाचं अनेक वर्षांपासून एकमेकांवर जीवापाड प्रेम होतं. पण त्यांच्या नात्याला कुटुंबाचा पाठिंबा मिळणार नाही, या भितीनं दोघांनीही २२ जूनला गाव सोडलं. त्यानंतर दोघांनी नोंदणी पद्धतीनं विवाह उरकला. पण इकडं मुलगी बेपत्ता झाल्याची तक्रार आई-वडिलांनी सातारा तालुका पोलिसांमध्ये नोंदवली.

तक्रार मिळताच, पोलिसांनी लगेच कारवाईला सुरुवात केली आणि प्रेमी युगुलाला शोधून पोलीस ठाण्यात आणलं. मात्र, त्यांनी एकमेकांच्या मर्जीनं रजिस्टर लग्न केल्याचं समोर आलं. पोलिसांनी दोघांच्याही कुटुंबीयांना पोलीस ठाण्यात बोलावून घेतलं. दोघंही सज्ञान असल्यानं सुखाचा संसार करू द्या, आडकाठी करू नका, असा सल्लाही दोन्ही कुटुंब प्रमुखांना दिला. पण आपल्या उच्च शिक्षित मुलीनं पळून जाऊन लग्न केलं.

## विधानसभेच्या ७६ लाख मतांचे गौडबंगाल



**मुंबई/प्रतिनिधी : राज्यातील विधानसभा निवडणुकांच्या निकालावर सर्वच विरोधी पक्षांनी शंका उपस्थित करत निवडणूक आयोगाला लक्ष्य केलं होतं. विशेष म्हणजे, शिवसेना उबाठा पक्षाचे खासदार संजय राऊत आणि काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी थेट निवडणूक आयोगावर प्रश्न्नचिन्ह उपस्थित करत सायंकाळी ६ नंतर वाढलेल्या ७६ लाख मतदारांचा आकडा संशयास्पद असल्याचे म्हटले होते. दुसरीकडे वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी याबाबत उच्च न्यायालयात धाव घेतली होती.**

### मुंबई हायकोर्टाने प्रकाश आंबेडकरांची याचिका फेटाळली; कोर्टाचा दिवस वाया घातल्याचा ठपका

न्यायालयाने दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर २५ जून रोजी निकाल देण्याचे जाहीर केले होते. त्यानुसार, आज प्रकाश आंबेडकर यांची याचिका फेटाळली आहे. तसेच, न्यायालयाचा वेळ वाया घालवला असं निरीक्षणही नोंदवलं आहे.

लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी अनेकदा महाराष्ट्रातील निकालावर शंका उपस्थित केली होती, तर



दोनच दिवसांपूर्वी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नागूपरमधील मतदारसंघातील मतांची आकडेवारी शेअर करत प्रश्न्न उपस्थित केला होता. भाजप आणि देवेंद्र फडणवीस यांच्याकडूनही काँग्रेसला आकडेवारीसह प्रत्युत्तर देण्यात आलं आहे. दुसरीकडे प्रकाश आंबेडकर यांच्यावतीने ७६ लाख मतदारांचा मुद्दा उपस्थित करत न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. मात्र, प्रकाश आंबेडकर यांची याचिका मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळली आहे. याचिकाकर्ते आणि आमचा कालच्या कामकाजाचा वेळ वाया घातला, असे निरीक्षणही हायकोर्टाने निर्णय >> पान २

## शुभांशूसह चार अंतराळवीर अंतराळ स्थानकाकडे झेपावले

### तब्बल ४१ वर्षांनी भारतीयाचे अंतराळात पाऊल

नवी दिल्ली : भारतीय अंतराळवीर शुभांशू शुक्ला आज २५ जून रोजी ॲक्सियम मिशन ४ अंतर्गत आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाकडे रवाना झाले. त्यांच्यासोबत इतर तीन अंतराळवीरही अंतराळ स्थानकाकडे जाणार आहेत. शुभांशू शुक्ला हे या मोहिमेचे पायलट आहेत. भारतीय वेळेनुसार दुपारी १२ वाजता फ्लोरिडा येथील नासाच्या केनेडी स्पेस सेंटरवरून हे मिशन लाँच करण्यात आले. सर्व अंतराळवीरांनी स्पेसएक्सच्या फाल्कन-९ रॉकेटशी जोडलेल्या ड्रॅगन कॅप्सूलमध्ये उड्डाण केले. ड्रॅगन अंतराळयान २६ जून रोजी दुपारी ४.३० वाजता सुमारे २८.५ तासांनंतर आयएसएसशी जोडले जाईल.

अमेरिकन अंतराळ संस्था नासा आणि भारतीय एजन्सी इस्रो यांच्यातील करारानुसार, भारतीय हवाई दलाचे ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला यांची या मोहिमेसाठी निवड करण्यात आली आहे. शुभांशू हे आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर जाणारे पहिले आणि अंतराळात जाणारे दुसरे भारतीय असतील. ४१ वर्षांपूर्वी राकेश शर्मा यांनी १९८४ मध्ये सोव्हिएत युनियनच्या



अंतराळयानातून अंतराळात प्रवास केला होता.

**मोहिमेचे उद्दिष्ट: अंतराळ स्थानक बांधण्याच्या योजनेचा एक भाग**

ॲक्स-४ मोहिमेचे मुख्य उद्दिष्ट अंतराळात संशोधन करणे आणि नवीन तंत्रज्ञानाची चाचणी करणे हे आहे. हे अभियान खाजगी अंतराळ प्रवासाला प्रोत्साहन देणे देखील आहे आणि भविष्यात व्यावसायिक अंतराळ स्थानक (ॲक्सियम स्टेशन) बांधण्याची योजना असलेल्या ॲक्सियम स्पेस प्लॅनिंगचा एक भाग आहे.

वैज्ञानिक प्रयोग: सूक्ष्म गुरुत्वाकर्षणात विविध प्रयोग करणे.

तंत्रज्ञान चाचणी: अवकाशात नवीन तंत्रज्ञानाची चाचणी आणि विकास.

आंतरराष्ट्रीय सहकार्य: विविध देशांतील अंतराळवीरांना व्यासपीठ >> पान २

## पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी जिल्ह्यासह नाशिक, पुणे, सातारा, कोल्हापूर परिसरात ऑरेंज अलर्ट

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात पुढील २४ तासात पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी जिल्ह्यासह नाशिक घाट, पुणे घाट, सातारा घाट, कोल्हापूर घाट परिसरात ऑरेंज अलर्ट देण्यात आला असल्याचे राज्य आपत्कालीन कार्य केंद्राने कळविले आहे.

कोकण किनारपट्टीला २५ जून रोजी सायंकाळी ५.३० पासून रात्रौ ८.३० वाजेपर्यंत भारतीय राष्ट्रीय महासागर माहिती सेवा केंद्र (आय.एन.सी.ओ.आय.एस.) तर्फे पर्यंत ३.५ ते ४.१मीटर पर्यंतच्या उंच लाटांचा इशारा देण्यात आला असून लहान होड्यांना समुद्रास न जाण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

नीरा नदी पात्रात विसर्ग सुरू सातारा जिल्ह्यात वीर धरणाच्या पाणलोट क्षेत्रामध्ये पाऊस सुरू असून धरणाची पाणीपातळी नियंत्रित करण्यासाठी २४ जून रोजी रात्री ११ वाजल्यापासून ३० हजार ५१३ क्युसेक्स विसर्ग नीरा नदी पात्रात सुरू करण्यात आला असून नागरीकांना सतर्कतेच्या सूचना देण्यात आल्या आहेत.जगबुडी नदी इशारा पातळीवर रत्नागिरी जिल्ह्यातील जगबुडी नदी इशारा पातळीवर असून नागरीकांना सतर्क करण्यात आले आहे. कोल्हापूर जिल्हयात पाटपन्हाळा, ता. राधानगरी येथे डोंगर उतारावरील माती सरकण्यास सुरवात झाल्यामुळे खबरदारी म्हणून डोंगरापासून २०० मीटर अंतरावर असणाऱ्या शाळेतील सर्व वर्ग सुरक्षित स्थळी हलविण्यात आले आहेत. गाव डोंगरापासून २ किमी अंतरावर असून कोणताही धोका नाही. पनोरी ते फराळे कारखाना रोड वाहतूक सुरू कोल्हापूर जिल्हयात राधानगरी तालुक्यातील पनोरी ते फराळे कारखाना रोडवर दरड



कोसळली होती. सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्ता रिकामा केला असून वाहतुक सुरळीत चालू आहे.राज्यात मागील २४ तासांमध्ये (२५ जून २०२५ रोजी सकाळपर्यंत) गडचिरोली जिल्ह्यात ४२.४ मिमी पाऊस झाला आहे. तर कोल्हापूर जिल्ह्यात ३८.९ चंद्रपूर जिल्ह्यात २२.५ मिमी, अकोला २२.३, आणि रत्नागिरी जिल्ह्यात २१.२ मिमी सर्वाधिक पावसाची नोंद झाली आहे.राज्यात कालपासून २५ जून रोजी सकाळपर्यंत झालेल्या पावसाची सरासरी आकडेवारी पुढीलप्रमाणे (सर्व आकडे मिलिमीटरमध्ये) :- ठाणे १०, रायगड ८.९, रत्नागिरी २१.२, सिंधुदुर्ग २०.५, पालघर ७.९, नाशिक २.९, धुळे १.७, नंदुरबार १३, जळगाव ३.२, पुणे ६, सोलापूर २.३, सातारा १०.५, सांगली ८.१, कोल्हापूर ३८.९, छत्रपती संभाजीनगर ०.२, लातूर ०.८, धाराशिव ०.८, नांदेड ३.१, परभणी ०.२, हिंगोली १, बुलढाणा ९.५, अकोला २२.३, वाशीम १.७, अमरावती ७.९, यवतमाळ ५.३, वर्धा ३.६, नागपूर ६.१, भंडारा ७.३, गोंदिया ५, चंद्रपूर २२.५ आणि गडचिरोली जिल्ह्यात ४२.४ मिमी पावसाची नोंद झाली आहे.मुंबई उपनगर जिल्ह्यात पाण्यात बुडून एक व्यक्तीचा मृत्यू, रत्नागिरी जिल्ह्यात पुराच्या पाण्यात वाहून एक व्यक्तीचा मृत्यू आणि नाशिक जिल्ह्यात दरड कोसळून दोन व्यक्ती जखमी झाल्या आहेत.

## लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज !

आज २६ जून, लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती. आजच्याच दिवशी १८७४ रोजी कागल येथील घाटगे घराण्यात त्यांचा जन्म झाला. त्यांच्या वडिलांचे नाव जयसिंगराव तर आईचे नाव राधाबाई असे होते. कोल्हापूर ( करवीर ) संस्थानचे चौथे शिवाजी महाराज यांच्या मृत्यूनंतर महाराणी आनंदीबाई यांनी कोल्हापूरच्या गादीचे वारसदार म्हणून त्यांना १७ मार्च १८८४ रोजी दत्तक घेतले कारण चौथे शिवाजी महाराज यांना मुलबाळ नव्हते. दत्तक घेतल्यावर त्यांचे छत्रपती शाहू म हाराज असे नामकरण करण्यात आले. शिक्षण पूर्ण झाल्यावर २ एप्रिल १८९४ रोजी ते कोल्हापूरच्या गादीवर विराजमान झाले. राज्यभिषेक झाल्यावर १९२२ पर्यंत म्हणजे २८ वर्ष ते कोल्हापूर संस्थानचे राजे होते. छत्रपती शाहू महाराजांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा आणि विचारांचा वारसा पुढे चालवला. छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवूनच त्यांनी राज्यकारभार केला म्हणूनच ते राजर्षी बनले. ते खऱ्या अर्थाने रयतेचे राजे होते. बहुजन समाजाला मानसिक गुलामीतूम बाहेर काढून, तत्कालीन रूढी परंपरा नाकारुन त्यांनी कोल्हापूर संस्थानामध्ये अनेक सामाजिक सुधारणा केल्या. शाहू महाराजांनी बहुजन समाजामध्ये शिक्षण प्रसार करण्यावर विशेष भर दिला. त्यांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले. शिक्षणाचे महत्व ओळखणारे देशातील पहिले राजे हे छत्रपती शाहू महाराज हेच होते. राज्यातील निरक्षर, गरीब, अस्पृश्य, दलित या बहुजन समाजातील लोकांना शिक्षण दिले तरच त्यांचा सर्वांगीण विकास होईल हे ओळखून त्यांनी समाजातील वंचित, दुर्लक्षित वर्गातील मुलांसाठी वसतिगृहे काढली. विविध जातीधर्मातील मुलांसाठी त्यांनी २२ वसतिगृहे स्थापली त्यात शेकडो मुले शिकली. शिक्षण क्षेत्रात मुलींची संख्या वाढली पाहिजे या हेतूने त्यांनी मुलींना ४० रुपये स्कॉलरशिप सुरू केली. ब्रिटिश सरकार शिक्षणावर वार्षिक ८० हजार रुपये खर्च करत असताना कोल्हापूर संस्थानचा शिक्षणावरील वार्षिक खर्च हा एक लाख रुपये इतका होता. यातच शाहू महाराज यांची शिक्षणाविषयी किती तळमळ होती हे दिसून येते. अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी त्यांनी सुवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा भरवण्याची दृष्ट पद्धत रद्द केली. गावच्या पाटलाने कारभार चांगला करावा यासाठी शिक्षण देणाऱ्या पाटील शाळा, तंत्र व कौशल्ये शिकवणाऱ्या शाळा त्यांनी सुरू केल्या. मागासलेल्या लोकांना प्रगतीच्या प्रवाहात आणायचे असेल तर त्यांच्यासाठी राखीव जागांची तरतूद केली पाहिजे हा व्यापक विचार डोळ्यासमोर ठेवून ६ जुलै १९०२ रोजी कोल्हापूर संस्थानात मागास जातींना ५० टक्के जागा राखीव ठेवल्या म्हणूनच त्यांना आरक्षणाचे जनक असे म्हणतात. शाहू म हाराजांच्या या निर्णयाला तेंव्हा खूप विरोध झाला पण विरोधाला न जुमानता त्यांनी या आरक्षणाची कठोर अंमलबजावणी केली. शाळा, दवाखाने, पाणवठे अशा सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यांशी सम तेने वागावे, त्यांच्याशी कोणीही भेदभाव करू नये असा आदेश त्यांनी काढला. १९१७ साली विधवा विवाहाला कायदेशीर मान्यता मिळवून दिली. त्यांनी देवादासींची घातक प्रथा बंद केली. बहुजन समाजाला राजकीय प्रवाहात सामावून घेण्यासाठी १९१६ साली निपाणी येथे डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. जातिभेदाची प्रथा नष्ट व्हावी म्हणून त्यांनी आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहास कायदेशीर मान्यता दिली. इतकेच नाही तर आपल्या चुलत बहिणीचे लग्न धनगर समाजातील यशवंतराव होळकर यांच्याशी लावून दिले. छत्रपती शाहू महाराजांनी स्पिनिंग अँड व्हीविंग मिल, शाहूपुरी व्यापारपेठ, शेतकऱ्यांच्या सहकारी संस्था, राधानगरी धरणाची उभारणी, शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करुन देणे असे अनेक उपक्रम आपल्या संस्थानात राबवले. त्यांनी शेतीच्या आधुनिकीकरणासाठी संशोधनाला पाठिंबा दिला. नगदी पिके आणि तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्यासाठी किंग एडवर्ड ॲग्रीकल्चर इन्स्टिट्यूटची स्थापना केली. चित्रकला, लोककला, संगीत, साहित्य, नाट्य, कुस्ती या क्षेत्रातील कलावंतांना त्यांनी राजाश्रय मिळवून दिला. शाहू महाराज आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे संबंध सर्वश्रुत आहे. बाबासाहेब मॅट्रिकमध्ये असताना आणि नंतर कोलंबिया युनिव्हर्सिटीत शिकत असताना त्यांनी बाबासाहेबांना स्कॉलरशिप दिली. २० आणि २१ मार्च १९२० रोजी माणगाव येथे अस्पृश्यता निवारण परिषदेत शाहू महाराजांनी बाबासाहेबांच्या कार्याचा गौरव करून कोल्हापूरच्या राजवाड्यात त्यांना जेवणाचे निमंत्रण दिले. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी मूकनायक हे साप्ताहिक सुरू केले पण आर्थिक अडचणीमुळे पुढे ते बंद करावे लागले जेंव्हा हे शाहू महाराजांना समजले तेंव्हा त्यांनी २५०० रुपयांची आर्थिक मदत देऊन हे साप्ताहिक पुन्हा सुरू केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा आणि विचारांचा वारसा समर्थपणे पुढे घेऊन जाण्याचे कार्य करणारा एक मानवतावादी राजा म्हणून शाहू महाराजांची इतिहासात नोंद आहे. व्यापक दूरदृष्टीच्या या राजाने त्याकाळी राजेशाही असूनही सामाजिक बंधुभाव, दलित व उपेक्षितांचा उद्धार, शिक्षण, उद्योगधंदे, कला, क्रीडा, आरोग्य या क्षेत्रांमध्ये जे कार्य केले आहे तसे कार्य आजवर कोणीही केले नाही. त्यांचे कार्य आजच्या आणि येणाऱ्या अनेक पिढ्यांसाठी मार्गदर्शक आहे. आज त्यांचा जन्मदिवस सामाजिक न्याय दिन म्हणून साजरा केला जातो ही एकप्रकारे त्यांच्या कार्याला दिलेली मानवंदनाच आहे. जयंतीदिनी लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराजांना विनम्र अभिवादन!

# उर्वरित पिकविम्यासाठी रविकांत तुपकरांनी मुंबईतून ठणकावले..! तुपकर आक्रमक..!

## ...अन्यथा शेतकऱ्यांना घेऊन एआयसी च्या मुंबईच्या कार्यालयात घुसू..! तुपकरांनी गाठले एआयसी कंपनीचे मुंबई कार्यालय..! मुंबईत क्षेत्रीय व्यवस्थापकांची घेतली भेट

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातील सन २०२३ व २०२४ चा हजारो शेतकऱ्यांचा पिकविमा अजूनही प्रलंबित आहे. नुकसान होऊनही अनेक शेतकरी पिकविम्याच्या लाभापासून वंचित असल्याने शेतकऱ्यांमध्ये असंतोष आहे. त्या अन्यायग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने पिकविमा मिळावा, यासाठी शेतकरी नेते रविकांत तुपकरांनी ॲग्रीकल्चर इन्शुरन्स कंपनीचे मुंबईतील कार्यालय गाठत राज्याचे क्षेत्रीय व्यवस्थापक श्री बी. प्रभाकर यांची भेट घेतली. राहिलेल्या विमा भरपाई बद्दल सविस्तर चर्चा करून त्यांना जाब विचारला व आक्रमक भूमिका घेतली..



बुलढाणा जिल्ह्यासह राज्यातील एआयसी विमा कंपनी कडे येणाऱ्या अनेक जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना अजून पर्यंत नुकसानभरपाई न मिळाल्याने युवा नेते रविकांत तुपकर चांगलेच आक्रमक झाले आहेत.. तुपकरांनी ए.आय.सी. कंपनीच्या मुंबई कार्यालयात जाऊन राज्याच्या क्षेत्रीय व्यवस्थापक बी प्रभाकर यांना चांगलाच जाब विचारला.. व त्यांना धारेवर धरले. भारतीय कृषी आयुर्विमा कंपनीने शेतकऱ्यांना फसविले आहे. आपले कर्मचारी जास्त नुकसान टाकतो म्हणून शेतकऱ्यांकडून पैसे उकळतात.. पंचनामा फॉर्म वर आवश्यक असतांनाही कृषी सहायक, सरपंच, ग्रामसेवक यांच्या सह्या नसतात, परस्पर कमी नुकसान टाकून तुमच्या कर्मचाऱ्याकडून फॉर्म भरले जातात असा आरोप तुपकरांनी केला.नुकसान होऊनही हजारो शेतकऱ्यांना विमा देण्यासाठी विमा कंपनी मुद्दाम टाळाटाळ करीत असल्याचेही तुपकरांचे म्हणने आहे.हा सरळ सरळ शेतकऱ्यांवर अन्याय आहे. विमा कंपनी व सरकारचे साटेलोटे असल्याचा गंभीर आरोपही तुपकरांनी केला. त्या खऱ्या नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई देण्यात यावी, अशी आग्रही मागणी यावेळी तुपकरांनी जोरदार पणे लावून धरली .भरपाई लवकर मिळाली नाही तर क्रांतिकारी शेतकरी संघटना नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना घेऊन एआयसीच्या मुंबई कार्यालयात घुसेल व आक्रमक आंदोलन करेल, असा कडक इशाराही तुपकरांनी यावेळी दिला..!

पान १ वरून...

### वीजदरात होणार कपात

व्यावसायिक ग्राहकांच्या तिन्ही श्रेणींना लागू होईल, अशी माहितीही यानिमित्तानं देण्यात आली. १०० युनिटपेक्षा कमी वीज वापरणाऱ्या ७० टक्के ग्राहकांसाठी, १० टक्के वीज दरात कमाल कपात केली जाईल, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

शेतकऱ्यांच्या विजेचा प्रश्नही सोडवण्याचा विडा या सरकारनं उचललाय. शेतकऱ्यांना दिवसा आणि विश्वासार्ह अखंड वीजपुरवठा करण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० चं काम युद्धपातळीवर सुरू असल्याचंही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. ''यासोबतच, येत्या काळात वीज खरेदी करारांमध्ये हरित ऊर्जेवर मोठ्या प्रमाणात भर दिल्यामुळे, वीज खरेदीच्या खर्चात बचत होईल,''. त्यामुळे वीजदर कपात करता येणार आहे असंही फडणवीस यांनी स्पष्ट केलं.

### गेल्या ११ वर्षांपासून देशात

पण त्यांना 'विश्र्वगुरू' व्हायचे आहे. एकीकडे ट्रम्प नरेंद्र मोदींना घाबरवतात आणि दुसरीकडे ते ट्रम्पच्या प्रचाराला जातात आणि 'अबकी बार ट्रम्प सरकार' असे म्हणतात, अशी टीका त्यांनी केली.

त्यांनी सांगितले की, भाजप सरकार गरिबांना गरीब आणि श्रीमंतांना श्रीमंत बनवत आहे. परिस्थिती अशी आहे की देशात गरीब आणि श्रीमंतांमधील दरी वाढत आहे, जी ते दूर करू शकत नाहीत. भाजप सरकारमध्ये सर्व काही निवडक उद्योगपतींना सोपवले जात आहे. नरेंद्र मोदी देशाची सर्व संपत्ती त्यांच्याच मित्रांना सोपवत आहेत. ही एक प्रकारची अघोषित आणीबाणी आहे. मोदी सरकार आपले अपयश आणि कमकुवतपणा लपवू इच्छिते. लोकांचे लक्ष खऱ्या मुद्द्यांपासून विचलित करण्यासाठी ते वेगवेगळ्या गोष्टी सांगत राहते.

राहुल गांधी जेव्हा देशात वेगवेगळ्या ठिकाणी जात आहेत आणि संविधान वाचवण्याबद्दल बोलत आहेत, ज्यामुळे लोकांमध्ये उत्साह आणि उत्साह निर्माण झाला आहे. तेव्हा नरेंद्र मोदी तो उत्साह संपवण्यासाठी देशात मोठे नाटक करत आहेत. जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाममध्ये एक खूप मोठी घटना घडली. आम्ही यासाठी विशेष संसद अधिवेशनाची मागणी केली होती, परंतु सरकारने ही मागणी मान्य केली नाही. आम्ही असेही म्हटले होते की सर्वपक्षीय बैठक बोलावली पाहिजे, ज्यामध्ये नरेंद्र मोदी देखील उपस्थित राहिले पाहिजेत, पण मोदी सर्वपक्षीय बैठक सोडून गेले, बिहारमध्ये प्रचार करत राहिले, इतर देशांच्या दौऱ्यावर गेले. मोदी स्वतःला खरा देशभक्त म्हणवतात, पण सर्वपक्षीय बैठकीला येत नाहीत, जनतेशी संबंधित मुद्दे ऐकत नाहीत. यावरून त्यांना देशवासीयांबद्दल किती सहानुभूती आहे हे दिसून येते.

### विधानसभेच्या ७६ लाख

देताना नोंदवले आहे. त्यामुळे, गेल्या अनेक महिन्यांपासून सुरू असलेल्या वादावर आता न्यायालयाने आपला निर्णय स्पष्टपणे दिला आहे.

विधानसभा निवडणुकीत संध्याकाळी ६ वाजल्यानंतर अचानक रहस्यमय पद्धतीने वाढलेल्या ७६ लाख मतांबाबत मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. वंचित बहुजन आघाडीचे चेतन चंद्रकांत अहिरे यांनी याबाबत न्यायालयात याचिका दाखल केली होती. यात ड. प्रकाश आंबेडकर यांनी न्यायालयात बाजू मांडली. पण, मुंबई उच्च न्यायालयाने याचिका फेटाळली आहे.

न्यायालयाच्या निर्णयावर उद्या भूमिका मांडणार

न्यायालयाने निर्णय दिला असून चेतन चंद्रकांत अहिरे यांची याचिका फेटाळली आहे. न्यायालयाकडून हा निकाल अपलोड झाल्यानंतर नेमकं याचिका फेटाळण्याचं कारण काय हे पाहता येईल. त्यानंतरच, मी माझी प्रतिक्रिया देईल असे प्रकाश आंबेडकर यांनी म्हटलं आहे. उद्या २६ जून रोजी सकाळी ११.३० वाजता मी मुंबईतील कार्यालयात पत्रकारांशी संवाद साधणार आहे, अशी माहितीही आंबेडकर यांनी दिली.

### शुभांशूसह चार अंतराळवीर

प्रदान करणे.

शैक्षणिक उपक्रम: अवकाशातून पृथ्वीवरील लोकांना प्रेरणा देणे आणि जागरूकता पसरवणे.

प्रश्न १: शुभांशू शुक्ला कोण आहेत?

उत्तर: शुभांशू यांचा जन्म १९८६ मध्ये उत्तर प्रदेशातील लखनौ येथे झाला. त्याने राष्ट्रीय संरक्षण अकादमी (एनडीए) मधून शिक्षण घेतले. ते २००६ मध्ये हवाई दलात सामील झाले आणि लढाऊ विमाने उडवण्याचा अनुभव आहे. त्यांची निवड इस्रोच्या गगनयान मोहिमेसाठीही झाली आहे, जी भारताची पहिली मानवी अंतराळ मोहीम आहे. अंतराळवीर होण्यासाठी त्याने रशिया आणि अमेरिकेत विशेष प्रशिक्षण घेतले. यामध्ये त्याने सूक्ष्म गुरुत्वाकर्षण, आपत्कालीन हाताळणी आणि वैज्ञानिक प्रयोगांमध्ये काम करायला शिकले.

प्रश्न २: शुभांशू आयएसएसवर काय करणार?

उत्तर: शुभांशू १४ दिवस तिथे राहील आणि ७ प्रयोग करतील, जे भारतीय शैक्षणिक संस्थांनी तयार केले आहेत. यापैकी बहुतेक जैविक अभ्यास असतील, जसे की अंतराळातील मानवी आरोग्यावर आणि जीवांवर होणारा परिणाम पाहणे. याशिवाय, तो नासासोबत आणखी ५ प्रयोग करतील, जे दीर्घ अंतराळ मोहिमांसाठी डेटा गोळा करेल. या मोहिमेत केलेले प्रयोग भारताच्या गगनयान मोहिमेला बळकटी देतील.

प्रश्न ३: या मोहिमेसाठी भारताला किती खर्च आला आहे?

उत्तर: भारताने आतापर्यंत या मोहिमेवर सुमारे ५४८ कोटी रुपये खर्च केले आहेत. यामध्ये शुभांशू आणि त्यांचे बॅकअप ग्रुप कॅप्टन प्रशांत नायर यांना प्रशिक्षण देण्याचा खर्च समाविष्ट आहे. हे पैसे प्रशिक्षण, उपकरणे आणि आंतरराष्ट्रीय भागीदारीवर खर्च केले जातात.

प्रश्न ४: हे अभियान भारतासाठी किती महत्त्वाचे आहे?

उत्तर: शुभांशूचा हा अनुभव गगनयान मोहिमेसाठी (२०२७ मध्ये नियोजित) खूप उपयुक्त ठरेल. परतल्यानंतर आणणारा डेटा आणि अनुभव भारताच्या अंतराळ कार्यक्रमाला पुढे नेण्यास मदत करू शकतो.

प्रश्न ५ : हे खाजगी अंतराळ मोहीम आहे का?

उत्तर: हो, ॲक्सियम मिशन ४ ही एक खाजगी अंतराळ उड्डाण मोहीम आहे. हे अमेरिकेची खाजगी अंतराळ कंपनी ॲक्सियम स्पेस आणि नासा यांच्या सहकार्याने होत आहे. हे ॲक्सियम स्पेसचे चौथे मिशन आहे.

प्रश्न ६ : शुभांशू त्यांच्यासोबत अंतराळात काय घेऊन जात आहे?

उत्तर: शुभांशू शुक्ला त्याच्यासोबत खास तयार केलेले भारतीय मिठाई घेऊन जात आहे. एका पत्रकार परिषदेत त्यांनी सांगितले होते की ते आंब्याचा रस, गाजराचा हलवा आणि मूग डाळ हलवा अंतराळात घेऊन जातील. त्यांनी सांगितले की ते हे आयएसएसवरील त्यांच्या सहकारी अंतराळवीरांसोबत शेअर करण्याची त्यांची योजना आहे.

आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानक म्हणजे काय?

आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानक हे पृथ्वीभोवती फिरणारे एक मोठे अंतराळयान आहे. अंतराळवीर त्यात राहतात आणि सूक्ष्म गुरुत्वाकर्षणाचे प्रयोग करतात. ते ताशी २८००० किलोमीटर वेगाने प्रवास करते. ते दर ९० मिनिटांनी पृथ्वीभोवती एक प्रदक्षिणा पूर्ण करते. ५ अंतराळ संस्थांनी संयुक्तपणे ते बांधले आहे. स्टेशनचा पहिला भाग नोव्हेंबर १९९८ मध्ये लाँच करण्यात आला.

# रामनगर भागातील ३५ लाख रुपयांच्या विकास कामाचे माजी आमदार संजय रायमुलकर यांच्या हस्ते भूमिपूजन

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** शहरातील रामनगर तसेच इतर भागातील नाणी बांधकाम सभामंडळ यास विविध ३५ लाख रुपये किमतीच्या विविध विकास कामाचे भूमिपूजन माजी आमदार संजय रायमुलकर यांच्या हस्ते २५ जून रोजी करण्यात आले. तसेच यावेळी कोट्यावधी रुपयाचे कामे प्रस्तावित असून त्या कामांना मंजूर सुद्धा मिळाली असल्याची माहिती माजी आमदार संजय रायमुलकर यांनी दिली.

शिवसेनेचे तत्कालीन आमदार संजय रायमुलकर यांच्या प्रयत्नातून रामनगर भागातील दहा कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्चाचे रस्ते व नाली बांधकाम त्याचप्रमाणे संरक्षण भिंती, स्वामी समर्थ केंद्र सभामंडप इत्यादी कामे करण्यात आली.तर, उर्वरित दोन कोटी रुपयांच्या कामांना प्रारंभ करण्यात आला आहे. मेहकर अंत्री देशमुख रस्ता ते अशोक मुळे यांचे घर या ३५ लाख रुपये खर्चाच्या सिमेंट रस्ता ,नाली बांधकामाचे आज त्यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले.



यावेळी बोलताना संजय रायमुलकर म्हणाले की , केंद्रिय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली मेहकर शहरात ९३२ कोटी रुपयांची विविध विकास कामे मंजूर करून आणलेली आहेत. शहराच्या विविध भागातील पूर्वी मंजूर करण्यात आलेले काही सिमेंट रस्ते, डांबरी रस्ते,संरक्षण भिंती आदी कामे सुरू करण्यात आली आहेत. अशोक वाटकेत एक कोटी रुपयांचे काम पूर्ण करण्यात आले असून उर्वरित एक कोटी रुपयांच्या बांधकामाला सुरुवात करण्यात आली आहे.८ कोटी खर्चाच्या छत्रपती शिवाजी महाराज उद्यानातील कामांनाही गती देण्यात आली आहे. शारंगधर बालाजी मंदिरातील ९ कोटींचे विविध विकास कामे पूर्णत्वाकडे जात आहेत. सव्वातीन कोटी रुपये खर्चाचे वारकरी भावनाचे बांधकाम अंतिम टप्प्यात आहे. राज्यात महायुतीचे सरकार असल्याने आणखीही मोठ्या प्रमाणात शहर व ग्रामीण विकासाची कामे मंजूर करून आणण्यात येतील, असेही ते म्हणाले.

पंचायत समिती इमारतीचे १५ कोटींचे बांधकाम , पोलीस स्टेशन इमारत बांधकाम आदी कामे प्रगतीत आहेत, अशी ही माहिती त्यांनी दिली. यावेळी अभियंता किशोर ढेपले,प्रदीप रहाटे, संतोष सारडा, विनायक देशमुख ,अभिषेक पिंपरकर, राजकुमार बर्डे ,लक्ष्मण देशमुख, हर्षल गायकवाड, शंकर ठाकूर ,विजय शेळके ,सचिन खराबे, बदामे,अशोक पिंपरकर, ऋषी थोरात, घनश्याम गायकवाड, मदन वेंडोले आदी यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### प्राध्यापकाला 'अटक वॉरंट'ची भीती दाखवून फसवणूक

**मुंबई/प्रतिनिधी :** वसई पश्चिम येथील ६३ वर्षीय निवृत्त प्राध्यापक संतोष अच्युत शेंडे सायबर फसवणुकीचा बळी ठरले आहेत. व्हॉट्सअॅप व्हिडिओ कॉलवरून 'ढठ-ख' आणि 'पोलिस खटल्याची' बनावट भीती दाखवत अज्ञात व्यक्तींनी त्यांच्याकडून फसवणूक केली. फसवेखोरांनी शेंडे यांना सांगितले की, त्यांच्या आधार कार्डाचा वापर करून बँक खाते उघडण्यात आले असून, त्यांच्याविरोधात अटक वॉरंट जारी झाला आहे. जर त्यांनी कुलाबा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली नाही, तर त्यांना थेट घरी जाऊन अटक केली जाईल, अशी धमकीही देण्यात आली.

या प्रकरणी वसई पोलिस ठाण्यात इछड २०२३ मधील कलम ३१९(२), ३१८(४), ३(५) आणि माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या कलम ६६(उ), १९८(ऊ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे (गुन्हा क्रमांक १८८/२०२५). आरोपी अद्याप फरार असून, पोलीस तपास सुरु आहे.

### राष्ट्रवादीच्या बैठकीला संग्राम जगतापांची दांडी, अजित पवारांचा इशारा; आमदाराने दिलं स्पष्टीकरण

**मुंबई/प्रतिनिधी :**राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे आमदार संग्राम जगताप गेल्या काही दिवसांत माध्यमांमध्ये चर्चेत आहे. हिंदुत्त्ववादी भूमिका घेत अल्पसंख्यांक समुदायाला त्यांनी लक्ष्य केल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. त्यावरुन, अजित पवारांनी देखील स्पष्टपणे आपली नाराजी व्यक्त केली. तसेच, आजच्या बैठकीत मी संग्रामला याबाबत बोलेन, तसेच आमचा पक्ष हा धर्मनिरपेक्ष असून सर्व जाती-धर्मांना सोबत घेऊन जाणारा असल्याचेही अजित पवारांनी स्पष्ट केले होते. मात्र, राष्ट्रवादीतील आमदारांच्या बैठकीला संग्राम जगताप यांनी दांडी मारल्याने आमदार जगताप यांच्या मनात नेमकं काय चाललंय, असा प्रश्न उपस्थित होत आहे. तर, आमदार संग्राम जगताप यांची कृती अजित पवारांची डोकेदुखी वाढवणारी ठरत आहे.

एकीकडे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष धर्मनिरपेक्ष पक्ष असल्याचं अजित पवारांचं विधान तर दुसरीकडे अजित पवारांनी बैठकीला बोलावून देखील आमदार संग्राम जगताप यांची राष्ट्रवादीच्या नियमित बैठकीला मंगळवारी दांडी पडल्याने जगताप यांच्या भूमिकेवरुन पुन्हा चर्चा होत आहेत. अजित पवारांनी संग्राम जगताप यांच्या कृतीबाबत आज झालेल्या आमदारांच्या बैठकीत स्पष्टपणे नाराजी व्यक्त केली. एकीकडे धर्मनिरपेक्ष पक्ष म्हणून आपण पुढे जात असताना एखाद्या धर्माबाबत वादग्रस्त किंवा आक्षेपार्ह विधान पक्षातील आमदाराने करणे पक्षाला परवडणारे नाही, असे अजित पवारांनी स्पष्ट शब्दात सांगितले. संग्राम जगताप यांच्यासारखी कृती खपवून घेणार नसल्याचा इशारादी अजित पवारांनी आमदारांच्या बैठकीत दिला आहे. आपण स्वत संग्राम जगताप यांच्याशी बोलणार असून अशा प्रकारची वादग्रस्त विधाने का करत असल्याचा जाब विचारणार असल्याचेही ते म्हणाले. मात्र, आमदार जगताप यांनी बैठकीला दांडी मारल्याने जगतापांच्या मनात नेमकं काय चाललंय, असाही प्रश्न उपस्थित होत आहे.

### अजित पवारांवर शिंदे गटाचे मंत्री नाराज

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली काल मंगळवारी (२४ जून) मंत्रालय, मुंबई येथे राज्य मंत्रिमंडळ बैठक संपन्न झाली. मात्र या कॅबिनेट बैठकीनंतर शिवसेना आणि राष्ट्रवादीत नाट्यमय बैठकांचं सत्र पाहायला मिळालं आहे. एकनाथ शिंदेंची शिवसेना मंत्र्यांबरोबर बैठक झाल्यानंतर मंत्री उदय सामंताकडून अजित पवारांची भेट घेण्यात आली. तर त्यानंतर अजित पवार आणि एकनाथ शिंदे या दोन उपमुख्यमंत्र्यांचीही भेट घडून आल्याचे बघायला मिळाले आहे. आगामी महापालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांना सामोरं जाण्यापूर्वी निधी वाटपाचा घोळ संपावा, याकरता उदय सामंतांनी पुढाकार घेत बैठकीत आपल्या पक्षाची बाजू मांडली असल्याचे बोललं जात आहे.

तर निधी वाटपबाबत शिवसेना मंत्र्यांची नाराजी पहाता अर्थमंत्री अजित पवारांपर्यंत शिवसेनेची भूमीका पोहोचवून तोडगा काढण्याची जबाबदारी उदय सामंतावर टाकण्यात आली असल्याची ही माहिती समोर आली आहे. त्यामुळे आता त्यांच्या शिष्टाईची महायुतीतील समन्वय राखन्यास कशी मदत होते हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

दरम्यान, निधीवाटपात शिवसेना मंत्र्यांना सापत्न वागणूक दिली जात असल्याच्या नाराजीवर तोडगा काढण्यासाठी शिवसेनेकडून तातडीची पावले उचलली जात आहेत. त्यामुळेच निधी वाटपबाबत शिवसेना मंत्र्यांची नाराजी पहाता अर्थमंत्री अजित पवारांपर्यंत शिवसेनेची भूमीका पोहोचवून तोडगा काढण्याची जबाबदारी उदय सामंत यांना देण्यात आली आहे. सोबतच आगामी निवडणूकीत मतदारांसमोर जातांना पुरेसा निधी आणि विकासकामे गरजेची आहेत. याकरता अर्थमंत्री अजित पवार आणि शिवसेना मंत्र्यांमध्ये समन्वय असणे गरजेचे असल्याची चर्चा आहे.

# भारतीय लोकशाही अबाधित राहण्यासाठी सर्वांचे सहकार्य महत्त्वाचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन : लोकतंत्र सेनानींचा सत्कार

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी :** देशातील लोकशाही ही सर्वोत्तम यंत्रणा आहे. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात लोकशाहीने महत्वपूर्ण भूमिका बजाविली आहे. सध्या भारत जगातील सर्वात मोठी चौथी अर्थव्यवस्था बनला आहे. भारताच्या या वेगवान विकासात लोकशाहीने आपले महत्व अधोरेखित केले आहे. भारतीय परंपरेत मुळे असणारी लोकशाही अबाधित राहण्यासाठी आपण सर्वांनीच सहकार्य करूया, असे आवाहन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी केले.

भारतीय इतिहासातील काळाकुट्ट अध्याय, संविधान हत्या दिवस २०२५ निमित्ताने लोकतंत्र सेनानींच्या सत्कार कार्यक्रमाचे आयोजन राजभवन येथील दरबार सभागृहात करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, सांस्कृतिक कार्य मंत्री अॅड.आशिष शेलार, आदिवासी विकास मंत्री प्रा. अशोक उईके उपस्थित होते.आणीबाणी ही प्रत्येक भारतीयाच्या मनातील सल असल्याचे सांगत राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन म्हणाले, आणीबाणी ही देशावर लादली गेली. या काळात देशविघातक कार्य झाले. जो कुणी आणीबाणीचा विरोध करेल त्याला कारागृहात डांबले जायचे. असह्य अत्याचार त्या काळात नागरिकांना सहन करावे लागले. आणीबाणीमुळे देशातील लोकशाहीवरच घाला घालण्यात आला. राज्यघटनेने दिलेल्या मुलभूत अधिकारांवर गदा आणण्यात आली. त्यातूनच आणीबाणीविरोधात जनमत तयार झाले. आपल्या विचारात, कार्यात व भविष्यातील योजनांमध्ये राष्ट्र प्रथम असले पाहिजे. स्वत:साठी न जगता राष्ट्रासाठी जगता आले पाहिजे. दुसऱ्यांसाठी जगा, हा मंत्र भारतीय लोकशाहीने दिला आहे. आज जगामध्ये सर्वात मोठी लोकशाही असणारा आपला भारत देश आहे. भारत विकसित होण्याकडे आगेकूच करीत आहे. विकासाच्या प्रवासाचा इथपर्यंतचा टप्पा हा मजबूत लोकशाहीमुळेच शक्य झाला आहे, त्यामुळे लोकशाहीला अधिकाधिक बळकट करण्यासाठी प्रत्येक भारतीयाने निश्चय केला पाहिजे, असे आवाहनही राज्यपालांनी यावेळी केले.

### प्रत्येक भारतीयाच्या मनात प्रबळ लोकशाहीची बीजे : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मंबई: आणीबाणी ही भारतीय लोकशाहीवरील हल्ल्याचा प्रयत्न होता. मात्र लोकतंत्र सेनानींनी मोठा लढा देत हा प्रयत्न हाणून पाडला. त्यासाठी सेनानींना मोठा संघर्ष करावा लागला. या लोकतंत्र सेनानींना सन्मानाच्या, कृतज्ञतेच्या भावनेतून मानधन देवून शासन त्यांचे ऋण फेडण्याचा प्रयत्न करीत आहे. प्रत्येक भारतीयाच्या मनात प्रबळ लोकशाहीची बिजे रोवली आहेत. आणि म्हणूनच आणीबाणीमुळे सेनानींचे कुठल्याही प्रकारचे मानसिक खच्चीकरण होवू शकले नाही, अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लोकतंत्र सेनानींचा गौरव केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, देशभरात सुधारणांसाठी आणीबाणीपूर्वी अनेक आंदोलने सुरू होती. या आंदोलनांचा धसका घेत तत्कालीन राजवटीने देशावर आणीबाणी लादली. ही आणीबाणी संविधानाच्या हत्येचे पातक ठरली. ४२ व्या घटनादुरूस्तीने संविधानाचा आत्माच काढण्याचे प्रयत्न झाले. मुलभूत अधिकार गोठवित मार्गदर्शक तत्वांना महत्व दिले गेले. या काळात भारतीय न्यायव्यवस्थेचेही महत्व कमी करण्यात आले. या काळामध्ये लोकतंत्र सेनानींनी दिलेल्या लढ्यामुळे लोकशाही आजही टिकून आहे. या काळात अनुशासनाच्या नावाखाली लोकशाही पायदळी तुडविण्यात आली. प्रसारमाध्यमांवर सेन्सॉरशिप आणण्यात आली. लोकशाहीवरील अशा संकटकाळातही ज्या देशातील लोकशाही व्यवस्था टिकून राहते, त्याच देशातील लोकशाही पुढे बळकट होते. लोकशाहीला कुणीही कधीही संपवू शकत नाही, हे लोकतंत्र सेनानींनी त्या काळात लढा देवून दाखवून दिले आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले.

### आणीबाणी विरोधात लोकतंत्र सेनानींनी केलेला संघर्ष प्रेरणादायी : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

मुंबई : देशात २५ जून, १९७५ हा काळा दिवस होता. या दिवशी आणीबाणी लागू करण्यात आली. अशा या काळ्या दिवसाला आज ५० वर्ष पूर्ण झाली. लोकशाही संपुष्टात आणण्यासाठी या आणीबाणीचा उपयोग करण्यात आला. हा काळ नागरिकांना व्यवस्थेचे गुलाम करणारा होता, अशा शब्दात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आणीबाणीचा निषेध व्यक्त केला.

आणीबाणी विरोधात लोकतंत्र सेनानींनी केलेला संघर्ष हा प्रेरणादायी असल्याचे सांगत उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, संविधानाची हत्या करीत नागरिकांच्या मुलभूत अधिकारांवर नियंत्रण आणले गेले. भारताचे संविधान अखंड आहे, जे कुणीही बदलू शकत नाही. देश हा संविधानाने चालत राहणार आहे. आणीबाणीच्या संघर्षकाळात लढा देणाऱ्या सेनानींचे कार्य कधीही विसरले जाणार नाही. अशा संघर्ष केलेल्या लोकतंत्र सेनानींच्या पाठीशी शासन उभे आहे, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दिली.

कार्यक्रमाला लोकप्रतिनिधी, वरिष्ठ अधिकारी, लोकतंत्र सेनानी उपस्थित होते. प्रास्ताविक राज्यपाल यांचे सचिव डॉ.प्रशांत नारनवरे यांनी केले. सुरूवातीला आणीबाणी काळातील मान्यवरांनी चित्रमय प्रदर्शनाची पाहणी केली. कार्यक्रमादरम्यान मुंबई शहर जिल्ह्यातील श्रीपाद गंगाधर मुसळे, अनिल रामनाथ लोटलीकर, मुंबई उपनगर जिल्ह्यातील मेधा सोमय्या, उदय माधवराव धर्माधिकारी, राजेंद्र यादव या सेनानींचा सत्कार करण्यात आला. आभार मुंबई शहरचे जिल्हाधिकारी आचल गोयल यांनी मानले.

### जळगावहून मुंबईला फक्त पाच तासांत पोहोचता येणार, समृद्धी महामार्गाशी जोडण्याच्या हालचाली

**जळगाव/प्रतिनिधी :** नागपूर ते मुंबई समृद्धी महामार्गाला जळगाव जोडण्याचा महत्वपूर्ण निर्णय मुख्यमंत्री आणि केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्र्यांच्या उपस्थितीत नागपूर येथे पार पडलेल्या बैठकीत झाला. जळगाव ते छत्रपती संभाजीनगर दरम्यानच्या प्रवासाला गती देतानाच, जळगावहून समृद्धी महामार्गावरून मुंबईला फक्त पाच तासात कसे पोहोचता येईल, त्यादृष्टीने बैठकीत चर्चा झाली.

जळगाव ते छत्रपती संभाजीनगर तसेच चाळीसगाव ते कन्नड दरम्यानच्या वाहतुकीला अधिक गतीमान व सुलभ करण्याच्या दृष्टीने नागपूरमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या उपस्थितीत महत्वाची बैठक रविवारी झाली. बैठकीला जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले, खासदार स्मिता वाघ, आमदार देवयानी फरांदे, आमदार मंगेश चव्हाण आदी उपस्थित होते. सद्य:स्थितीत जळगावहून अजिंठा, सिल्लोडमार्गे छत्रपती संभाजीनगरला पोहोचण्यासाठी दोन ते अडीच तास लागतात. हा रस्ता समृद्धी महामार्गाशी जोडण्यापूर्वी जळगाव ते छत्रपती संभाजीनगर दरम्यानचा प्रवास अवघ्या एका तासावर आणण्याचे बैठकीत ठरले. छत्रपती संभाजीनगरहून मुंबईला समृद्धी महामार्गाने पोहचण्यासाठी चार तास लागतात. जळगाव ते छत्रपती संभाजीनगर दरम्यानच्या प्रवासाचा एक तास आणि पुढील प्रवासाचे चार तास गृहीत धरले तर केवळ पाच तासात जळगावहून मुंबईला पोहोचणे त्यामुळे शक्य होणार आहे.

### जलपुनर्भरणाचे धोरण तयार करावे : पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांचे निर्देश

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी :** जलसंधारण विभागाच्या पाणीपुरवठा योजनांच्या स्त्रोताजवळील भूजल पुनर्भरणाचे स्त्रोत बळकट करण्यासाठी जलपुनर्भरणाचे धोरण तयार करावे. जेणेकरून, नागरिकांना शाश्वत पाणीपुरवठा उपलब्ध होईल, असे पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांनी सांगितले.

मंत्रालयात महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व जिल्हा परिषद, नागपूर अंतर्गत पाणीपुरवठासंदर्भात आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले. यावेळी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, पाणीपुरवठा विभागाचे सहसचिव डॉ. बापू पवार, राज्य पाणी व स्वच्छता अभियानाचे अभियान संचालक ई.रवींद्रन, नागपूरचे मुख्य अभियंता सुभाष भुजबळ, मुख्य अभियंता प्रशांत भामरे उपस्थित होते.या बैठकीत नागपूर विभागातील पाणीपुरवठा योजनांचा आढावा घेण्यात आला. महसूल मंत्री बावनकुळे यांच्या सुचनेनुसार विभागीय पातळीवरील अडचणी, स्रोतांचा दर्जा आणि भविष्यातील गरजा यावर सखोल चर्चा झाली. यावेळी पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला ग्रामीण भागातील पाणीपुरवठा सक्षम करण्यावर भर द्यावा तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून घरोघरी पाणीपुरवठा सुनिश्चित करण्यासाठी धोरण तयार करण्याचे निर्देश दिले.राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या प्रगतीपथावरील योजनांची कामे पूर्ण करण्यास आवश्यक निधी लवकरात लवकर उपलब्ध करून घेवून कामे पूर्ण करावीत, असे निर्देश श्री. पाटील यांनी दिले.महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, भूजल पातळी वाढवण्यासाठी भूजल सर्वेक्षण विकास विभागाने भूजल पुनर्भरण योजना तयार करून त्याबाबतचे धोरण निश्चित करावे. नागपूर जिल्ह्यातील सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेकरिता स्वतंत्र पाणीपुरवठा योजना, कामठी छावणी परिषद यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याबाबतही यावेळी चर्चा करण्यात आली. नागपूर पेरी अर्बन (१२ गांवे) प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेचे दर जास्त असल्याने, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने संबंधित नगर पंचायत, ग्राम पंचायतीला पाण्याच्या उंच टाकीपर्यंत ठोक तत्वावर पाणी पुरवठा करणे व नगर पंचायत, ग्राम पंचायतीने पुढील वितरण व्यवस्थेची देखभाल दुरुस्तीसह पाण्याची देयके, त्याची वसुली थेट ग्राहकाकडून करणे याबाबतही चर्चा करण्यात आली.

### सौर ऊर्जा प्रकल्प वेळेत पूर्ण करा : अपारंपरिक ऊर्जा मंत्री अतुल सावे

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात सौर ऊर्जेचा व्यापक स्वरुपात उपयोग करताना सुरू असलेल्या सौर ऊर्जा प्रकल्पांच्या कामांना अधिक गती द्यावी. तसेच प्रकल्प वेळेत पूर्ण करुन त्यामध्ये गुणवत्ता सर्वोच्च प्राधान्याने राखावी, असे निर्देश अपारंपरिक ऊर्जा मंत्री अतुल सावे यांनी दिले. अपारंपरिक ऊर्जा मंत्री अतुल सावे यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) संस्थेच्या नियामक मंडळाची १०७ वी बैठक मंत्रालयात झाली. या बैठकीस राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, महाऊर्जाच्या महासंचालक डॉ. कादंबरी बलकवडे,महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनीचे संचालक विश्वास पाठक तसेच विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. अपारंपरिक ऊर्जा मंत्री सावे म्हणाले, सौर ऊर्जा प्रकल्प ही काळाची गरज आहे. राज्याच्या ऊर्जेच्या गरजा पूर्ण करण्यासाठी स्वावलंबी होण्यात सौर प्रकल्पांची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. राज्यातील ग्रामीण भागात तसेच शासकीय इमारती, पोलिस वसाहती, शाळा, महाविद्यालये आणि आरोग्य केंद्रे अशा विविध ठिकाणी सौर ऊर्जा प्रकल्प राबविण्याची योजना आहे. या प्रकल्पांमुळे विजेची बचत होऊन खर्चातही लक्षणीय घट होणार आहे. पारंपरिक ऊर्जेवरील अवलंबित्व कमी करुन कार्बन उत्सर्जनात घट होण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

डिसेंबर २०२५ पर्यंत राज्यातील सर्व शासकीय कार्यालये सौर ऊर्जेवर संचालित होतील तर २०३० पर्यंत राज्यातील ५० टक्के वीजनिर्मिती ही अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांमधून होईल. 'महाऊर्जा'ची नवीन प्रशासकीय इमारत डिकार्बनायझेशन आणि स्वच्छ ऊर्जा या संकल्पनांनुसार बांधण्यात आली असल्याचे श्री. सावे यांनी यावेळी सांगितले.बैठकीत महाऊर्जा स्वनिधीमधून करण्यात येणाऱ्या प्रशासकीय योजना प्रकल्प खर्चासाठी वित्तवर्ष २०२४-२५ च्या सुधारीत वार्षिक अंदाजपत्रकास कार्योत्तर मान्यता व वित्तवर्ष २०२५-२६ च्या प्रस्तावित अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात आली. ऊर्जेसाठी कुसुम पोर्टल, एक खिडकी सुविधा, ई-गव्हर्नन्स व इतर संगणक विषयक सेवा-सुविधा प्रकल्प कार्यकारी अधिकारी, प्रकल्प अधिकारी व लेखापाल ही रिक्त पदे भरणे यांना मान्यता देण्यात आली.

## गुणवंत खेळाडू घडवण्यासाठी गावा गावात क्रीडा सुविधांसाठी ५० कोटी रुपयांची तरतुद : क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील ग्रामीण भागात क्रीडा क्षेत्रात अनेक गुणवंत विद्यार्थी आहेत. त्यांच्या गुणांना वाव मिळावा तसेच त्यांना सोयी-सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी राज्यात गावागावात क्रीडा सुविधा उभारण्यासाठी ५० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. यामध्ये प्रत्येक गावात १० लाख रुपयांपर्यंतचे क्रीडा साहित्य पुरवण्यास क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे यांनी मंजुरी दिली. राज्य क्रीडा विकास निधी सनियंत्रण समितीची बैठक क्रीडा मंत्री भरणे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झाली.

राज्यातील खासगी शैक्षणिक संस्थेद्वारे चालविण्यात येणाऱ्या अनुदानित तसेच विनाअनुदानित प्राथमिक, माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, ज्यांना शिक्षण विभागाने मान्यता दिली आहे अशा सर्व शैक्षणिक संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था, विविध विभागांमार्फत चालविण्यात येणाऱ्या शाळा, आश्रमशाळा, वसतीगृहे यांना हे क्रीडा साहित्य पुरविण्यात येणार आहे. तसेच एकविध खेळाच्या क्रीडा संघटन, खासगी क्लब, क्रीडा मंडळे, युवक



मंडळ, महिला मंडळे यांनाही १० लाखापर्यंतचे क्रीडा साहित्य देण्यास मान्यता देण्यात आली. हातकणंगले व हुपरी तालुका क्रीडा संकुल संदर्भात बैठकीत चर्चा करण्यात आली. यासाठी आवश्यक निधीच्या मंजुरीसाठी प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तर धारावी येथील भारतरत्न राजीव गांधी जिल्हा क्रीडा संकुल, मुंबई शहर या कामामधील त्रुटी ठेकेदार कंपनीने तत्काळ दूर कराव्यात. कोणतेही काम अपूर्ण ठेऊ नये अशा सूचना क्रीडा मंत्री भरणे यांनी यावेळी दिल्या.

# लोकशाहीच्या मूल्यांसाठी लढलेले सेनानी आजच्या पिढीसाठी दीपस्तंभ : निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे

## आणीबाणी लढ्यातील गौरवमूर्तींचा तालुकास्तरावर सन्मान; चित्रप्रदर्शनाचेही उद्घाटन

**दैनिक आपला विदर्भ**

**वाशीम/प्रतिनिधी :** आणीबाणी काळात भारतीय संविधान आणि लोकशाहीची मूल्ये कायमस्वरूपी जतन करण्यासाठी लोकशाही लढ्यातील बंदिवास भोगलेल्या सेनानींचे मोलाचे योगदान राहिले असल्याचे प्रतिपादन निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे यांनी केले. देशातील १९७५ साली लागू झालेल्या आणीबाणीला ५० वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त सन १९७५ ते १९७७ मधील आणीबाणीच्या कालावधीत वाशीम जिल्ह्यातील बंदिवास सोसलेल्या व्यक्तींचा वाशीम , मालेगाव व मंगरूळपीर तहसील कार्यालयात सन्मान करण्यात आला.तसेच आणीबाणी लढ्यातील गौरवमूर्तींच्या सन्मानार्थ चित्रप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी संबोधित करतांना घुगे बोलत होते.

यावेळी २५ जून रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन भवन परिसरात आयोजित आणीबाणी काळातील घडामोडींवर आधारित चित्रप्रदर्शनाचे उद्घाटन निवासी जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाला उपजिल्हाधिकारी विरेंद्र जाधव, जिल्हा माहिती अधिकारी यासिरोद्दिन काझी, जिल्हा नियोजन अधिकारी संजय राठोड, जिल्हा क्रीडा अधिकारी किशोर बोंडे, जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी सागर हवालदार, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शाहू भगत, सहाय्यक अधीक्षक सुनील घोडे, सविता डांगे यांचीही उपस्थिती होती.आणीबाणी लढ्यातील व्यक्तींनी भारतीय संविधान आणि लोकशाहीची मूल्ये भविष्यातही कायमस्वरूपी जतन ठेवण्याचा संदेश पुढच्या भावी पिढीपर्यंत निरंतरपणे पोहोचवावा,'' अशी अपेक्षा निवासी जिल्हाधिकारी श्री घुगे यांनी यावेळी व्यक्त केली. देशात २५ जून १९७५ ते ३१ मार्च १९७७ या कालावधीत घोषित करण्यात आलेल्या आणीबाणीच्या कालावधीत ज्या व्यक्तींना बंदिवास सोसावा लागला, अशा व्यक्तींचा सन्मान व यथोचित गौरव करण्याच्या व आणीबाणी संदर्भात प्रदर्शन आयोजित करण्याच्या सूचना केंद्र व राज्य शासनाने जिल्हा प्रशासनाला दिल्या होत्या. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालय आणि जिल्हा माहिती कार्यालयाच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.त्यानंतर निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांनी चित्रप्रदर्शनाला भेट देवून पाहणी केली. या प्रदर्शनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी तसेच नागरिक उपस्थित होते.



## विविध वृत्त...

### आमदार साहेब सिंदखेडराजा मतदार संघातील प्रवासी निवाऱ्याकडे बघा-दिलीप राठोड

**दैनिक आपला विदर्भ**



**महारचिकना /प्रतिनिधी :** सध्या पावसाळ्याचे दिवस आहे शाळकरी विद्यार्थी शाळेत आपल्या बस स्थानकापासून ये जा करत असतात तसेच शेतकरी वर्ग सुद्धा शेतीला लागणारी बी बियाणे औषधी आपल्या खेड्या गावातून मुख्य रस्त्यावर पैदल जावे लागते तेथे कुठल्याही प्रकारचा प्रवासी निवारा नसतो शाळकरी मुले सुद्धा त्या फाट्यावर येऊन झाडाच्या खाली उभे असतात पावसाळ्याचे दिवस सुरू आहेत आणि सिंदखेड राजा मतदार संघात विजेचे कडकडासह काहींना आपले प्राण गमवावे लागले आहे अशातच काही मुले नागरिक आपल्या गावा लगतच्या फाट्यावर येऊन थांबतात परंतु तेथे प्रवासी निवारा नाही पाऊस असो वारा असो पाणी असो अशातच त्यांना झाडाच्या आश्रयाने उभे राहावे लागत आहे आमदार साहेब आपण या मतदारसंघाचे आमदार आहात अगोदरच्या आमदाराने वीस पंचवीस वर्षे सत्ता भोगली परंतु मतदार संघामध्ये प्रवासी निवारा बहुतेक ठिकाणी झाला नाही आमदार साहेब आपण नवतरुण आणि शिक्षणाची जाण असलेले शिक्षण क्षेत्रातही आपण आपले पाय रोवलेले आहे आपण आपण या शिक्षण घेणाऱ्या मुलां आणि मुली करिता ज्येष्ठ नागरिकांकरिता प्रवासी निवारा कधी बांधाल शाळकरी विद्यार्थी आपल्या प्रवासी निवाऱ्याची वाट बघतायेत ज्येष्ठ नागरिक सुद्धा मोठ्या अशाने थांब्यावर बसण्याची वाट बघतायेत आमदार साहेब आपण या प्रवासी निवारासाठी आपल्या निधीतून तात्काळ खर्च कराल अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे लोणार तालुकाध्यक्ष दिलीप राठोड यांनी एका प्रसिद्धी द्वारे केली आहे

### ऊर्जा विभागाच्या कामकाजाचा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी घेतला आढावा

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील शेतकऱ्यांच्या मागणीनुसार सौर ऊर्जा पंपाची मागणी पूर्ण करावी. महावितरण, महाजनको आणि महानिर्मितीने वीज निर्मिती आणि वीज बचतीचे उपक्रम प्रभावीपणे राबवावे असे निर्देश ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी दिले. एच.एस.बी.सी.बँक, फोर्ट येथे महावितरण, महापारेषण आणि महानिर्मिती या कंपन्याच्या काम काजाचा आढावा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर घेतला. महापारेषणचे कार्यकारी संचालक सतीश चव्हाण, कार्यकारी प्रकल्प संचालक अविनाश निंबाळकर, कार्यकारी संचालक श्रीमती सुचित्रा भिकाने, मुख्य अभियंता पियुष शर्मा, संचालक वित्त बाळासाहेब थिटे, संचालक संचालन, संजय मारुडकर, प्रकल्प संचालक अभय हरणे, कार्यकारी संचालक नितीन वाघ यासह विभागातील अधिकारी बैठकीला उपस्थित होते. ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी महावितरण, महापारेषण व महानिर्मिती या तिन्ही कंपन्याच्या वीज निर्मितीचे प्रकल्प आणि त्यांची सद्यस्थिती, म हाअभिकरण ऊर्जा, विभागामार्फत राबवण्यात येणाऱ्या विविध योजना याबाबत आढावा घेतला.

विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना, शेतकऱ्यांसाठी महत्त्वपूर्ण असलेल्या मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना, मागेल त्याला कृषी पंप योजना, केंद्र व राज्य शासनाच्या इतर विविध योजना यांची माहिती यावेळी बैठकीत सादर करण्यात आली.

## जिल्हा परिषद शाळेत चिमुकल्यांची किलबिलाट सुरू



**दैनिक आपला विदर्भ**

**■ गजानन जाधव**

**बेलगाव :** येथील जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक व जिल्हा परिषद शाळा उर्दू शाळेमध्ये २३ जून रोजी नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत करून करण्यात आली.

तसेच यावेळी सरपंच विमलताई अर्जुनराव वानखेडे, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष अर्जुनराव वानखेडे यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांना शालेय गणवेश आवश्यक शालेय साहित्याची वाटप करण्यात आले.

यावेळी गावातील नागरिक, पालक, शिक्षक आणि शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्याने उत्कृष्ट सहभाग घेतला होता.विद्यार्थ्यांच्या उत्सवात भर घातली जिल्हा परिषद मराठी व उर्दू प्राथमिक शाळा बेलगाव पालकांची आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत टाकण्याची मानसिकता अशी झाली आहे की, माझा मुलगा किंवा मुलगी इंग्रजी माध्यमाच्या शाळेत टाकल्यास चांगली नोकरी मिळू शकते, इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये चांगली सुविधा आणि शिक्षण मिळते, मूल इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकलेले हवे असते, त्यामुळे जिल्हा परिषद शाळांकडे दुर्लक्ष केले जाते. शाळेत मुलांना टाकले जिल्हा परिषद शाळेत टाकल्यास या गैर समज मध्ये असतात यामुळे पालक जास्त इंग्रजी माध्यमाच्या शाळेला प्राधान्य देतात म्हणून आज शहरी आणि ग्रामीण जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थी संख्या कमी होत असून या इंग्रजी शाळेचा फटका मात्र गरीब वर्गाला बसत आहे. जिल्हा परिषद शाळे मध्ये विदयार्थी संख्या कमी होत असल्यामुळे बऱ्याच जिल्हा परिषद शाळा बंद होण्याचा मार्गावर आहे.

यामुळे गरीब वर्गाला इंग्रजी शाळेत शिक्षण घेणं परवडणार नसल्याने गरीब वर्ग अशिक्षित राहणार असल्याचे चित्र उभे टाकले आहे. तर बेलगाव ग्रामपंचायत घेतला जे पालक आपल्या मुलांना मुलींना जिल्हा परिषद शाळेमध्ये टाकतील त्यांना घरपट्टी व नळपट्टी माफ करण्यात येईल जिल्हा परिषद शाळा कशा वाचवता येईल यामध्ये आता ग्रामपंचायत ने सुद्धा मोठा सिंहाचा वाटा घेतलेला दिसत आहे

## नागपूर हिंसाचार प्रकरणातील ९ आरोपींना न्यायालयाकडून जामीन मंजूर

**दैनिक आपला विदर्भ**

**नागपूर/ प्रतिनिधी:** नागपूर शहराच्या महाल परिसरात १७ मार्च रोजी दोन गटात झालेल्या तूफान राडा आणि दगडफेकीनंतर दंगल उसळली होती. या हिंसाचार प्रकरणाबाबत आता नवी माहिती समोर आली आहे. नागपूर हिंसाचार घटनेतील ९ आरोपींना न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने या ९ आरोपींना प्रत्येकी एक लाख रुपयांवर जामीन मंजूर केलाय. १७ मार्चला नागपूरच्या महाल परिसरात हिंसाचार आणि जाळपोळीची घटना झाली होती. या प्रकरणात नागपूर पोलिसांनी १३ विविध एफआयआर नोंदवीत शंभरावर आरोपींना अटक केली होती. याच प्रकरणाचा निकाल देत सत्र न्यायालयाने आरोपींचा जामीन फेटाळल्यावर जामिनासाठी आरोपींनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खमंडपीठात धाव घेतली होती. यावर आज सुनावणी पार पडली असून ९ आरोपींना न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे.

दरम्यान, नागपूर हिंसाचार प्रकरणात या आरोपींचा कुठलाही संबंध नसल्याचे युक्तिवाद आरोपींच्या वकिलानी कोर्टात केला. आज या जामीन प्रकरणावर सुनावणी करीत दंगलीत सहभाग असल्याचा आरोप असलेल्या ९ जणांना कोर्टाने जामीन मंजूर केलाय. यात इकबाल अंसारी, एजाज अंसारी, अफसार अंसारी, इजहार अंसारी, अशफाकउल्ला, मुज्जमिल अंसारी, मोहम्मद राहिल, इफ्तेखार अंसारी, मोहम्मद यासिर यांना कोर्टाने जामीन मंजूर केलाय.

तर दुसरीकडे, या प्रकरणातील मास्टरमाइंड असलेला मोहम्मद फहिम खान आणि इतर आरोपी हे अजूनही न्यायालयीन कोठडीत आहे. फहीम खानवर असलेले आरोप आणि पोलिसांचा सुरु असलेला तपासाची स्थिती बघता न्यायालयाने जामीन द्यायला नकार दिला आहे. १७ मार्चला नागपूर मध्ये हिंसाचार घडला आणि १८ मार्चला फहीम खानवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करत अटक करण्यात आली होती. सध्या फहीम खान हा नागपूर कारागृहात आहे. दरम्यान त्याने केलेल्या जमीन अर्जावर नागपूर जिल्हा सत्र न्यायालयाने निर्णय देऊन हा अर्ज फेटाळून लावला आहे.

## महागाव (सोईट) शेत शिवारात बिबट्याने केली गाय-वासरूची शिकार

**दैनिक आपला विदर्भ**



**उमरखेड/ प्रतिनिधी:** बिबट्याने गाय आणि वासरू याची शिकार केल्याची घटना उमरखेड तालुक्यातील महागाव (सोईट) येथील शेतात २५ जून रोजी सकाळच्या सुमारास उघडकीस आली.


याबाबत प्राप्त माहितीनुसार, महागाव (सोईट) येथील संजय जळबा वाठोरे हे २४ जूनला दररोज प्रमाणे आपल्या शेतात दुसऱ्या गोठ्यात रात्री बारा वाजेपर्यंत थांबून घरी आले होते नंतर सकाळी शेतात गेले असता त्यांना आपली गाय आणि वासरूची हिस्त्र प्राण्याने शिकार करून ठार केल्याचे दिसले. त्यांनी वनविभागाला फोन लावले असता वनविभाग अधिकारी घटना स्थळावर येऊन पंचनामा केल्यावर त्यांनी सांगितले की गाय आणि वासराची शिकार बिबटयाने केली आहे. त्यानंतर संजय जळबा वाठोरे यांनी वनविभागाकडे तक्रार दाखल केली असून पुढील तपासणीसाठी पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना कळविले आहे.या घटने मुळे येथील शेतकरी दहशतीचत असून या परिसरातील कृष्णापूर व महागाव (सोईट )भागात अनेकवेळा बिबट्या ने गाय, बैल व शेळ्यांचा शिकार केला आहे. या घटना वारंवार घडत असून एखादी मोठी दुर्घटना घडण्यापूर्वी वनविभागाने बिबट्याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी या भागातील शेतकऱ्यांनी केली आहे.

## जाचक अटी रद्द करा; योजनांचा लाभ पोहचू द्या : ॲड.जयश्री शेळके

### लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळाच्या कर्ज योजनांच्या अटींमुळे गरजू लाभार्थी वंचित

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलडाणा/प्रतिनिधी :** लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळाच्या योजनांवरील जाचक अटी त्वरित रद्द कराव्यात, अशी जोरदार मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) प्रवक्त्या ॲड.जयश्री शेळके यांनी समाजकल्याण विभागाकडे केली आहे. समाजाच्या वंचित घटकांसाठी सुरू करण्यात आलेल्या या योजनांचा उद्देशच शासनाच्या कठोर अटींमुळे अयशस्वी ठरत असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला आहे.



अण्णाभाऊ साठे महामंडळाच्या माध्यमातून मातंग समाजातील तरुण, बेरोजगार, महिला व उद्योजक यांना स्वावलंबनासाठी शासकीय कर्ज सुविधा उपलब्ध करून देण्यात येते. मात्र प्रत्यक्षात जामीनदारांची सक्ती, तीन हमीदारांचे हमीपत्र, सातबाऱ्यावर बोजा नोंद, ७०० पेक्षा जास्त क्रेडिट स्कोअरची अपेक्षा, बँकेकडून प्राथमिक मंजुरी आणि ऑनलाईन अर्ज प्रक्रियेतील अडचणी यांसारख्या अटी लाभार्थ्यांना आर्थिक व मानसिक त्रासदायक ठरत आहेत.

"शासनाने १००० कोटींचे भांडवली अनुदान दिले असले, तरी अशा अटींमुळे लाभार्थी योजनांपासून दूर राहतात. ग्रामीण भागातील गरजू, होतकरू तरुण व महिलांना या अटी पार पाडणे शक्य नसते,'' असेही शेळके यांनी सांगितले.

त्यामुळे, महामंडळाच्या उद्दिष्टांची पूर्तता व्हावी आणि लाभार्थ्यांना सुलभतेने कर्ज मिळावे यासाठी शासनाने या अटी तात्काळ रद्द करून एक सुलभ आणि व्यवहार्य प्रक्रिया लागू करावी, अशी मागणी शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) प्रवक्ता ॲड.जयश्री शेळके यांनी समाजकल्याण विभागाकडे केली आहे. यावेळी मेहकर विधानसभा मतदार संघांचे आमदार मा. सिद्धार्थभाऊ खरात, जिल्हाप्रमुख वसंतभाऊ भोजने, उपजिल्हाप्रमुख आशिषदादा रहाटे, सह संपर्कप्रमुख दत्ताभाऊ पाटील, युवासेना जिल्हाप्रमुख नंदूभाऊ कऱ्हाडे, युवासेना शहर प्रमुख अनिकेतभाऊ गवळी उपस्थित होते !